प्रेसनोट

लाच मागणी कारवाई

ला.प्र.वि.नंदुरबार, दिनांक ०१/०३/२०२६

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | नंदुरबार |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद कमांक | शहादा पो.स्टे. गु.र.क्र. २७२/२०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | कलम ७, ७ अ, भ्र.प्र.अधिनियम,१९८८, दिनांक ०१/०३/२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | अभिजित गोवर्धन भावसार, वय ४३ वर्षे,<br>नेमणूक – कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, शहादा,जि.नंदुरबार |
| लाच मागणी रक्कम | रु.१,५०,०००/– लाच स्विकारली रक्कम – निरंक |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार, वय ४२ वर्षे हे ग्रामपंचायत अधिकारी म्हणून भादे, ता.शहादा येथे नेमणूकीस असतांना तक्रारदार दिनांक १२/०८/२०२५ रोजी त्यांची तब्येत अचानक बिघडल्याने ते वैद्यकीय रजेवर गेले होते. दिनांक १६/१०/२०२५ रोजी ते वैद्यकीय रजेवरुन हजर होण्यासाठी जात असतांना त्यांचे व्हाटसअॅपवर आलोसे श्री.अभिजित भावसार यांनी एक फोटो पाठविला. त्यात अर्जदार यांचे चौकशीचे प्रपत्र १ ते ४ भरलेबाबतचे कव्हरींग लेटर होते. तक्रारदार यांनी आलोसे यांना कॉल करुन सदरबाबत विचारले असता आलोसे यांनी १ ते ४ प्रपत्राबाबत पुढील कारवाई करायची नसेल तर त्यांना भेटण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदार यांनी दिनांक १७/१०/२०२५ रोजी कर्तव्यावर हजर होवून आलोसे यांची भेट घेतली असता आलोसे यांनी १ ते ४ प्रपत्र पुढे न पाठविता कारवाई थांबविण्यासाठी तसेच तक्रारदार यांचा वैद्यकीय रजा कालावधीतील ३ महिन्यांचा पगार काढण्यासाठी साहेबांना गटविकास अधिकारी २ लाख रु. द्यावे लागतील असे बोलून तक्रारदाराकडे २ लाख रु लाच मागणी केली होती. सदर तक्रारीची दिनांक १७/१०/२०२५ रोजी पंचासमक्ष पंचायत समिती कार्यालय, शहादा येथे पडताळणी केली असता आलोसे याने तक्रारदाराचे १ ते ४ प्रपत्र भरुन पुढील कारवाई न करण्यासाठी तसेच तक्रारदाराचा वैद्यकीय रजा कालावधीतील पगार काढून देण्यासाठी गटविकास अधिकारी यांच्यासाठी तडजोडीअंती १,५०,००० रु लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर तक्रारदार यांचे वडीलांचा अपघात झाल्याने ते त्यांचे मुळ गावी परभणी येथे गेले असल्याने ते दिनांक १२/०२/२०२६ रोजी परत आल्यावर दिनांक १३/०२/२०२६ व दिनांक १६/०२/२०२६ रोजी सापळा कारवाई आयोजित केली असता आलोसे अभिजित भावसार याने लाच रक्कम स्विकारली नाही.<br>आलोसे हे लाच रक्कम स्विकाणार नाहीत याबाबत खात्री झाल्याचे मुळ तक्रारदार यांनी कळविल्याने आलोसे अभिजित भावसार याचे विरुद्ध लाच मागणीबाबत सदर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| फिर्यादी | पो.नि.विकास लोंढे , ला.प्र.वि.नंदुरबार |
| तपास अधिकारी | पोउपअधीक्षक, प्रशांत भरते, ला.प्र.वि.नंदुरबार |
| मार्गदर्शन | १.मा.श्री.भारत तांगडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>२.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक<br>३.श्री.सुनील दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की,भ्रष्टाचारासंबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणा–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, १२, जयचंद नगर, कोरीट रोड,नंदुरबार

संकेतस्थळ :– https://acb.maharashtra.gov.in

ई मेल :– spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacbnandurbar@gmail.com

ऑनलाईन तक्रार :– acbmaharashtra.net

टोल फ्री कमांक :– १०६४

दुरध्वनी कमांक :– ०२५६४.२३१००९

व्हॉटसॲप कमांक :– ९४२३५४१०६४


(प्रशांत शिवाजीराव भरते)

पोलीस उप अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग.

नंदुरबार